# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ३१४ दिनांक :- ११/११/२०२१

## वरसावे नाका येथे अवजड वाहनांना प्रवेश बंदी करीता वाहतूक नियंत्रण अधिसुचना जारी.

मिरा-भाईंदर शहरातील वरसावे नाका येथे जुन्या खाडी पुलाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दुरुस्तीचे काम तातडीने करण्यासाठी सदरच्या पूलाची एक लेन बॅरीकेटींग लावून दिनांक-१३/११/२०२१ ते दिनांक १५/११/२०२१ रोजी पर्यत सलग ३ दिवस बंद ठेवावी लागणार असल्याचे डेपुटी मॅनेजर (टेक.) एन.एच.ए.आय, पी.आय.यु, भरूच यांनी पत्र पाठवून कळविले आहे.

यामुळे वरील प्रमाणे पुलाचे कामासाठी ३ दिवस सलग पुलाची एक लेन बॅरीकेटींग लावून वाहनांसाठी बंद करण्यात येऊन केवळ एकच लेन वाहनांना मार्गस्थ होण्यासाठी शिल्लक राहणार असल्याने ठाणे व मुंबई बाजूकडून पालघर-गुजरात बाजूकडे जाणारी अवजड व हलकी वाहने एकाच वेळी एकाच लेन वरून मार्गस्थ करावी लागल्यास मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होऊ शकते. तसेच ठाणे व मुंबईकडून मोठया प्रमाणात हजारो अवजड वाहने वरसावे जुन्या खाडी पुलावरुन पालघर-गुजरात बाजुकडे मार्गस्थ होत असतात. यामुळे अवजड वाहनांना वरसावे पुलावरून मार्गस्थ होऊ न देता दुसऱ्या पर्यायी मार्गाने मार्गस्थ केल्यास बहुतांशी वाहनांची संख्या कमी होऊन वाहतूक कोंडी कमी होण्यास मोठा फरक पडणार आहे.

त्याकरिता तत्कालीन पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी अवजड वाहनांच्या वाहतुकीकरिता खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी केलेली आहे.

१ राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर ते सुरत दरम्यान असलेल्या वरसावे जून्या पूलाच्या दुरुस्तीकामी सदर पूलावरील दहिसर - सुरत मार्गावरील पहिली मार्गीका ३ दिवस बंद करण्यात येत आहे. सदरची मार्गिका बंद कालावधीत तिच्या लगत असणाऱ्या दुसऱ्या मार्गिकेवरून गुजरात दिशेने हलक्या वाहनांना वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे.

२ सदरच्या संपूर्ण कालावधीत जुन्या वरसावे पुलावरुन वाहतुक करण्याकरिता सर्व जड - अवजड वाहनांना पुर्णवेळ वाहतुकीस मनाई करण्यात येत आहे. निराकेंद्र/गायमुख या ठिकाणी गुजरातकडे जाणाऱ्या जड - अवजड वाहनांना वरसावे पुलाकडे जाण्यासाठी प्रवेश बंद करण्यात येत आहे. त्या वाहनांची वाहतुक खालील पर्यायी मार्गावर वळविण्यात येत आहे.

# <u>पर्यायी मार्ग</u>

**<u>ठाणे शहर हद्दीतून वरसावे मार्गे पालघर बाजूकडे येणारी जड-अवजड वाहने</u> :—**

१. मुंब्रा खारेगाव टोलनाका-मानकोली-अंजूरफाटा-खारबाव-कामण-चिंचोटी मार्गे इच्छीत स्थळी जातील.

२. मुंब्रा खारेगाव टोलनाका-मानकोली-वडपे-नदी नाका भिवंडी-अंबाडी-कुडूस-वाडा-मनोर मार्गे इच्छीत स्थळी जातील.

३. मुंब्रा खारेगाव टोलनाका-मानकोली-वडपे-नदी नाका भिवंडी-अंबाडी-वर्जेश्वरी-गणेशपूरी-शिरसाड फाटामार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही ‘‘महसूल विभागाची वाहने, पोलीस वाहने, अग्निशमन दलाची वाहने, रुग्णवाहिका, व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, पोलीस विभाग, तालुका दंडाधिकारी व भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सुरत यांनी परवानगी दिलेली वाहने’’ या वाहनांना लागू राहणार नाही. तसेच सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना दि. **१३/११/२०२१ रोजी** ००.०५ वाजता ते दि. **१५/११/२०२१ रोजी** २३.५५ वाजेपर्यत्नच्या कालावधी करीता अंमलात असणार आहे.

------------oooo-------------